**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या….**

1. **सध्याच्या सात ते आठ टक्के वृद्धीदरापेक्षा जास्त वाढीची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत असल्याचं जागतिक बँकेच्या अध्यक्षांचं प्रतिपादन**
2. **मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालय स्टार रेटिंग प्रणालीचा प्रारंभ**
3. **इस्रायलमध्ये रोजगारासाठी राज्यातील ६० बांधकाम कामगारांची पहिली तुकडी उद्या होणार रवाना**
4. **पीएम सूर्यघर योजनेत नागपूर परिमंडळाने गाठला ५०० मेगावॅटचा टप्पा**

   **आणि**
5. **अमरावती आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये उद्या मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट**

---------------------------------------------------------

आर्थिक वृद्धीदर

सध्याच्या सात ते आठ टक्के आर्थिक वृद्धीदरापेक्षा जास्त वाढीची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत आहे, असं प्रतिपादन जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी केलं आहे. अमेरिकन ॲशाविले इथं जी-२० देशांच्या अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नर्सच्या परिषदेच्यावेळी ते बोलत होते. जागतिक स्तरावरचे उर्जा संकट, अनिश्चित व्यापार तसंच एल निनोचा परिणाम अशा अनेक गोष्टींमुळे भारताच्या आर्थिक कामगिरीवर परिणाम झाल्यांचं त्यांनी नमूद केलं. आताची वाढ ही भारताच्या क्षमतेची चुणूक आहे असंही त्यांनी सांगितलं. या परिषदेत सहभागी झालेल्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मेला सीतारामन यांनी अजय बंगा यांची भेट घेतली. भारतात बहुस्तरीय गुंतवणूक हमी आणि इतर महत्त्वाच्या मुद्यांवर यावेळी चर्चा झाली.

---------------------------------------------------------

सार्वभौम मानांकन

JCRA या जपानच्या पतमानांकन संस्थेनं भारताचं सार्वभौम मानांकन BBB+ (प्लस) वरून सुधारुन A- (मायनस) शेृणीत आणलं आहे. भारताची भक्कम आर्थिक वाढ, मजबूत खाजगी खरेदी आणि सार्वजनिक गुंतवणूक, तसंच वित्तीय प्रणालीच्या सुदृढतेत झालेल्या सुधारणांच्या पार्शवभूमीवर हे मानांकन सुधारलं

असल्याचं JCRA च्या अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. भारतीय अर्थव्यवस्थेनं ७ टक्क्यापेक्षा जास्त उच्च वाढीचा दर कायम राखला आहे, सरकारनं उत्पादकता वाढ आणि आर्थिक विकासाकरता अनुकूल धोरणांची सातत्यानं अंमलबजावणी केली आहे, याची नोंद या निवेदनात घेतली आहे.

---------------------------------------------------

स्टार रेटिंग

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालय स्टार रेटिंग प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. एकात्मिक डॅशबोर्डमुळे विविध आरोग्य योजनांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध होऊन डेटा आधारित निर्णय घेण सुलभ होणार आहे. '१०४' कॉल सेंटरच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद, रुग्णांचा पाठपुरावा आणि तातडीच्या प्रकरणांवर कार्यवाही केली जाणार आहे. रुग्णालयांच्या स्टार रेटिंगमध्ये सेवा, कर्मचारी, औषधपुरवठा, स्वच्छता आणि रुग्णांच्या अभिप्रायासह विविध निकषांचा समावेश आहे.

---------------------------------------------------

कुशल बांधकाम कामगार

महाराष्ट्रातील १०३ कुशल बांधकाम कामगारांपैकी ६० जणांची पहिली तुकडी उद्या इस्रायलला रवाना होणार आहे. भारत आणि इस्रायल सरकारच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात प्लास्टरिंग, सिरेमिक टायलिंग, फ्रेमवर्क आणि आयर्न बेंडिंग या चार व्यवसायांतील कामगारांची निवड झाली आहे. कामगारांना इस्रायलमध्ये दरमहा सुमारे दोन लाख रुपये वेतन, वद्यकीय सुविधा आणि सुरक्षित रोजगार मिळणार असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. राज्यातील सुमारे चार लाख नोंदणीकृत बांधकाम कामगारांची छाननी करून ९९७ उमेदवारांची निवड करण्यात आली होती. वद्यकीय, पोलीस आणि अन्य पडताळणीनंतर ७८३ उमेदवारांना अंतिम मान्यता मिळाली असून, त्यांना टप्प्याटप्प्याने इस्रायलला पाठविण्यात येणार आहे.पहिल्या तुकडीतील कामगार तेल अवीव येथे कार्यरत होणार आहेत.

---------------------------------------------------

सॉफ्ट लोन

केंद्र सरकारच्या सॉफ्ट लोन योजनेच्या धर्तीवर राज्यातल्या सहकारी साखर कारखान्यांना पतपुरवठा करण्यासाठीचा प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले आहे, राज्यातल्या सहकारी

साखर कारखान्यांसाठी पतपुरवठा आणि कारखान्यातली संलग्न उत्पादनं याबाबत धोरण ठरवण्यासाठी आज मुंबईत झालेल्या बठकीत त्या बोलत होत्या. आगामी गाळप हंगामात पूर्वतयारीसाठी आणि ऊसउत्पादकांना एफआरपीची रक्कम वेळेवर देता यावी याकरता सॉफ्ट लोनची मदत होईल.

---

नेपाळ पुर

नेपाळमधल्या आकस्मिक पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या अकराशेच्या वर गेली असून ओळख पटलेले मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. अद्याप ९११ मृतदेहांची ओळख पटलेली नाही. जवळपास चार हजारांपेक्षा जास्त अजूनही बेपत्ता आहेत. दरम्यान, अकरा जणांचं बचावपथक आणि साडेपाच टन औषधं घेऊन भारताचं पाचवं मदत पथक विमानाने काठमांडू इथं पोचल्याची माहिती नेपाळमधल्या भारतीय दूतावासाने दिली आहे.

---

पीएम सूर्यघर

महावितरणच्या नागपूर परिमंडळाने 'पीएम सूर्यघर मोफत बिजली योजने'अंतर्गत ५०१.०१ मेगावॅट स्थापित सौर क्षमता गाठत राज्यात अव्वल स्थान कायम ठेवले आहे.नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांतील १ लाख ३१ हजार २४९ ग्राहकांनी रूफटॉप सौर प्रकल्प बसवले आहेत.यापक्की नागपूर जिल्ह्यात ४१८.६३ मेगावॅट, तर वर्धा जिल्ह्यात ८२.३८ मेगावॅट सौर क्षमता निर्माण झाली आहे. या योजनेअंतर्गत १ लाख १९ हजार २६७ ग्राहकांच्या खात्यात ९२७.८४ कोटी रुपयांचे अनुदान जमा झाले आहे. रूफटॉप सौर प्रकल्पामुळे ग्राहकांना वीजबिलात मोठी बचत होण्यासोबतच अतिरिक्त वीज महावितरणला विकण्याची संधी मिळत आहे.

---

बहिष्कार

गोंदियात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी धरणं देत निषेध मोर्चा काढला. जळगाव जिल्ह्यात ग्रामसेवक प्रल्हाद पाटील यांचा ग्राम सभेदरम्यान झालेल्या मारहाणीत मृत्यू झाल्याच्या घटनेचा निषेध करत हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातले ३०० हून अधिक नियमित आणि कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी सहभागी झाले होते. वाशीम मध्ये देखील अश्या प्रकारचा मोर्चा काढण्यातआला. ग्रामसभांदरम्यान धमकी, शिवीगाळ आणि मारहाणीच्या घटनांचा निषेध करत महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत

अधिकारी संघटनेने वाशीम जिल्हा परिषद ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मूक मोर्चा काढला.

-----------------------------------------------------

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील अधिकारी आणि  कर्मचाऱ्यांना वरिष्ठ श्रेणीमध्ये पदोन्नती देण्यासंदर्भातील प्रस्ताव मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. आज मंत्रालयात सहकार मंत्री  बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बठकीत वर्धा तसेच नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी संबंधित विविध प्रशासकीय विषयांचा आढावा घेण्यात आला.

-----------------------------------------------------

नवीन परीक्षा केंद्र

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अमरावती विभागीय मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या दहावी आणि बारावी परीक्षेसाठी नवीन परीक्षा केंद्रांना अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज विक्री आणि स्वीकारण्याचा कालावधी १ ते ३० सप्टेंबर असून, अर्जाची किंमत १ हजार रुपये आहे. ३० सप्टेंबरनंतर प्राप्त अर्ज स्वीकारले जाणार नसल्याच विभागीय सचिव प्रिया देशमुख यांनी कळवलं आहे.

-----------------------------------------------------

पवित्र पोर्टल

आदिवासी विकास विभागाच्या अमरावती अपर आयुक्त कार्यालयांतर्गत शासकीय आश्रमशाळांतील ४६८ शिक्षक पदांची भरती पवित्र पोर्टलद्वारे सुरू आहे. या भरतीतील शिफारसप्राप्त २९६ उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी ३ ते ५ सप्टेंबर दरम्यान अमरावती इथं होणार आहे. सर्व शिफारसप्राप्त उमेदवारांनी संकेतस्थळावरील सूचना तपासून कागदपत्र पडताळणीस उपस्थित राहावे, अस आवाहन करण्यात आलं आहे.

-----------------------------------------------------

राज्यमंत्री इंद्रनील नाईक

केंद्र आणि  राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती तरुणांना व्हावी आणि त्यातून त्यांनी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, या उद्देशाने आयोजित प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा आणि  प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराकडे वळावे, असं  आवाहन उच्च आणि तंत्र शिक्षण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केलं . एमएसएमई आणि  विकास कार्यालयाच्या वतीने सेंट्रल इंडिया

कॉलेज ऑफ फार्मसी, लोणारा इथं आयोजित सहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. मुलींनी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

-----------------------------------------------------

दिशा सालियन

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश आज मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआयला दिले आहेत. मात्र, तपासादरम्यान, सबळ पुराव्यांशिवाय कोणालाही आरोपी मानलं जाणार नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं.

-----------------------------------------------------

चीन मास्टर्स बॅडमिंटन

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदंबी श्रीकांतने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. चिनी तप्रेईच्या चि यु जेनला त्यांने २१-१६,२१-१५ असं हरवलं. लक्ष्य सेनला मात्र कॅनडाच्या व्हिक्टर लाय कडून पराभव पत्करावा लागला.मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांची जोडी थायलंडच्या जोडीला पराभूत करून पुढच्या फेरीत गेली.

-----------------------------------------------------

हवामान

पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज प्रादेशिक हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला असून, उद्या देखील नागपूर, भंडारा, आणि गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसाचा येलो अलर्ट कायम राहणार आहे. उद्या, अमरावती आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे . याशिवाय उद्या संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता आहे. आगामी काही तासांमध्ये वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

-----------------------------------------------------